International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb - 2022

# मधु सावंत यांच्या कथेतील शेतकरीजीवन

१शैला आनंदराव क्षीरसागर
संशोधक विद्यार्थी
फलटण मुधोजी महाविद्यालय फलटण
Email- shalakaraut54@gmail.com

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाला महत्त्व आले. हे शिक्षण खेडयापाडयापर्यंत पोहचले.त्यामुळे खेडयातील जीवन बदलले. मुलींना शिक्षणाची संधी मिळू लागली आणि स्त्रीयांचा श्वास मोकळा होऊ लागला. या स्त्रीयांनी केवळ स्त्री म्हणून न जगता एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करुन घेतला. या स्त्रीया परिवर्तनाला सामोरे जाऊन समाजातील वास्तव अतिशय धाडशीपणाने लेखणीतून मांडताना दिसतात. या स्त्रीयांनी स्वतःचा आत्मशोध तर घेतलाच पण त्याचबरोबर समाजातील सर्व स्तरातील दुःख, व्यथा– वेदना मांडण्याचा प्रयत्न आपल्या कथा कादंब–यातून केला आहे. या लेखिकांच्या साहित्यावर म. फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असलेला दिसून येतो. ग्रामीण माणूस कष्टाळू असून त्याची उपासमार होत आहे. तो दारिद्रयाचे चटके सोसत आहे. ही सामाजिक जाणीव घेऊनच ग्रामीण लेखिकांनी ग्रामीण कथाविश्वात एक वेगळा ठसा उमटविला आहे. या लेखिकांनी फार मोठी झेप घेऊन ग्रामीण साहित्याला कवेत घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

मराठी साहित्यविश्वात मथू सावंत एक ग्रामीण लेखिका म्हणून नावारुपाला आलेले नाव आहे. मराठी साहित्यात ग्रामीण लेखिकांची संख्या त्यामानाने बोटावर मोजण्याइतकीच असली तरी अनेक लेखिकांनी स्त्रीजीवन , स्त्रीमन, कुटुंबामधील नातेसंबंध, कृषीकेंद्रितता, शैक्षणिकता राजकारण, उपेक्षित शेतकरी ,शेती शेतमजूर अशा अनेकविध विषयावर लेखन केले आहे. यामध्ये सरोजिनी बाबर, प्रतिमा इंगोले , अनुराधा गुरव, मथू सावंत, ललिता गादगे, नलिनी महाडिक, रेखा बैजल, मंजुषा सावरकर, शैलजा गावंडे अशा अनेक ग्रामीण लेखिकांनी सामाजिक प्रश्नांचा वेध घेऊन त्या प्रश्नांना वाचा फोडली आहे.

श्रमिक शेतक–याचे जीवनचित्रण–

एकोणीशे ऐंशीनंतरच्या दरम्यान एकूणच ग्रामीण जीवन बदलले एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावरचे बदललेले ग्रामीण जीवन,बदललेला निसर्ग ,बदललेला माणूस याचे वास्तव चित्रण केले आहे. शेतक–याचे दैन्य, दुःख, त्यांचे जटिल प्रश्न लेखिकांनी आपल्या कथातून मांडले आहेत. मधु सावंत या एक परिवर्तनशील अशा ग्रामीण लेखिका असून त्यांनी शेतकरी व शेतमजूर, पोखरलेले राजकारण शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचारी प्रवृत्ती यांचे विदारक दर्शन घडविले आहे. शेती आणि शेतकरी हा ग्रामीण जीवनाचा आत्मा असून शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे.परंतु आजचा शेतकरी परावलंबी जीवन जगत आहे. अस्मानी संकटांचा सामना करता करताच त्याला सुलतानी संकटालाही सामोरे जावे लागते. नैसर्गिक संकटे तर वारंवार येतातच म्हणजे कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ.परंतु या निसर्गाशी संघर्ष करतच तो बारा महिने अठरा काळ राबत असतो तरीही तो दरिद्रीच राहतो सतत त्याच्या कुटुंबाची ससेहोलपट होताना दिसते.याचे वास्तव चित्रण मधु सावंत यांनी आपल्या कथेतून केले आहे. निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी हतबल झालेला असून तो शेवटचा पर्याय म्हणून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.आजच्या शेतक–यासमोर अनेक समस्या आहेत.शेतीसाठी खर्च केलेल्या भांडवलाइतकेही उत्पन्न नाहीच पण याउलट तो अधिक कर्जबाजारी होतो निसर्गाच्या अवकृपेवर मात करुन कसेतरी उत्पन्न काढतो परंतु येथेही तो चिरडला जातो कारण त्याच्या मालाची किंमत करण्याचा अधिकार त्याला नसून व्यापा–यांना असतो.एवढेच नव्हे तर

निसर्गाचा कोप होवून सगळं जीवन उद्ध्वस्त होते सरकारकडून काही तुटपुंजी भरपाई मिळते तीपण त्यांच्यापर्यंत पोहचत नाही आणि पोहचलीच तर त्यातला हिस्सा घ्यायला मानवीरुपी पशू तयारच असतो याचे दर्शन मथू सावंत यांनी श्वल्ली आग'(पाणबळी) या कथेतून घडविले आहे. अचानक अतिवृष्टी झाल्याने पूर येतो आणि अनेक शेतक–यांचे शेत वाहून जाते.त्यांच्यासाठी सरकार एक हजार चारशे रुपये अनुदान पाठविते पण गावचा पाटील पाचशे रुपये हिस्सा मागतो . मात्र हक्काची जाणीव झालेला सोनबा हा शेतकरी अत्यंत धीराने दोन्ही संकटाना सामोरे जाताना दिसतो अनुदानातील हिस्सा दयायचे नाकारतो त्याची ही भूमिका धाडसी वृत्तीची दिसून येते.

शेती हा असा व्यवसाय आहे की शेतीमध्ये जे भांडवल घातले जाते तितका फायदा होईल याचीही शाश्वती नसते. व्यापारी त्यांना हातोहात लुटत असतात त्यांच्या राजकीय डावपेचाला हे शेतकरी बळी पडतात. श्गळाटा'मधील बळी (पाणबळी) हा एक प्रातिनिधिक रुपात येथे पहायला मिळतो. मुलीच्या लग्नात हुंडा देण्यासाठी ज्वारी विकण्याशिवाय पर्याय नसतो तो ज्वारी घेवून मार्केटमध्ये जातो परंतु त्याला वेगवेगळी कारणे सांगून त्याची ज्वारी खरेदी केली जात नाही मात्र श्रीमंत असणा–या आनंद पाटलाची शंभर पोती ज्वारी त्याच्यासमोर लगोलग विकली जाते ही सर्व परिस्थिती बघून या व्यवस्थेविषयी त्याला प्रचंड चीड येते पण तो काहीच करु शकत नाही त्याची ही असहायता मनाला अस्वस्थ करते.

मथु सावंत यांच्या कथेतील सगळाच शेतकरीवर्ग बळीचा बकरा बनला नसून श्हबाडा'सारख्या कथेतील शेतकरी आत्मभान येवून जागृत झालेला पहायला मिळतो. शेतक–यांचा प्रतिनिधी म्हणून मिरवत असणा–या आप्पासाहेबांचे बिंग उत्तमराव देशमुख, हणमंता पाटील इतर शेतक–यांच्या मदतीने फोडतात. शेतकरी हा अलीकडे परिवर्तनाच्या मार्गाने जाताना दिसत आहे हा एक आशावादी दृष्टिकोन येथे महत्त्वाचा वाटतो. गावात निघालेल्या मोर्चाने आप्पासाहेबांचे बिंग फुटल्याने विद्रोह पेटलेला असतो त्यामुळे कापसाचे वजन होणार नसते परंतु शेतक–यांच्या विद्रोही भाषेपुढे ग्रेडरसाहेबाचे काहीच चालत नाही शेवटी सुट्टीच्या दिवशीच वजन करणे भाग पडते.

मथु सावंत यांनी शेतक–यांची व्यथा–वेदना अत्यंत संवेदनशील मनाने टिपली असून ग्रामीण माणूस या समाजव्यवस्थेविरुद्ध अन्याय–अत्याचाराविरुद्ध लढणारा आहे त्या शेतक–यांच्या संघर्षशीलवृत्तीची प्रचिती काही कथातून आल्याशिवाय राहत नाही. उदा." ....आसं किती दिस खाली मान घालून जगायचं...." ही संघर्षशीलवृत्ती काहीशी हतबल तर काहीशी बंडखोर दिसते. शेतक–यांचा भोग संपवण्यासाठी समाजामध्ये आमूलाग्र परिवर्तन होण्याशिवाय गत्यंतर नाही हा विचार येथे अधोरेखित होताना दिसतो.त्यांच्या कथेविषयी प्रा. डॉ. जया कदम म्हणतात,".... अन्यायग्रस्त शेतकरी वर्षानुवर्ष झालेल्या अन्यायाविरुद्ध विद्रोह करताना दिसतात. शेळी होवून जगण्यापेक्षा वाघ होवून एक दिवस जगणे ते स्वीकारतात ...."

एकूणच शेतक–यांच्या जीवनातील व्यथा–वेदनांचे चित्रण करण्यात मथू सावंत यांची कथा यशस्वी झाली आहे असे म्हटले तरी उचित ठरेल.कारण शेतक–यांच्या मनातील संघर्षाची ज्योत पेटवून तेवत ठेवण्याची ताकद त्यांच्या कथेत दिसून येते.

निष्कर्ष –

1. मथु सावंत यांनी उपेक्षित शेतकरी त्याचे दारिद्रय, मानसिक – आर्थिक पिळवणूक, कष्ट, उपासमार, अन्याय, बंडखोरी याचे चित्रण करुन आत्मभान आलेला शेतकरीही चित्रित केला आहे.
2. शेतकरी हा खराखुरा श्रमिक असूनही तो शोषितांचे जीवन जगताना दिसतो . या वेदनेतून लेखिकेची लेखणी अत्यंत प्रगल्भपणे सामाजिक जाणीव ठेवून लेखन करताना दिसते. शेतक–यांची ही वेदनाच वाचकांना अस्वस्थ करुन जाते.

संदर्भ–

1. नागनाथ कोत्तापल्ले–ग्रामीण साहित्य स्वरुप शोध–मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे,

द्वितीयावृत्ती –1993
2. प्रा. डॉ. जया कदम– मराठी ग्रामीण लेखिकांची कथा–शब्दवैभव प्रकाशन, पुणे , प्रथमावृत्ती–2016
3. प्रा. डॉ. जया कदम– पाणबळी–संगत प्रकाशन, नांदेड , प्रथमावृत्ती–2006